प्रेसनोट

दिनांक ३०/०९/२०१९

**आरोपी लोकसेवक अनंत भानुदास चलमले वय ४७ वर्षे, पद तलाठी, वर्ग–३, सज्जा कोळनुर ता.जळकोट, जि.लातूर रा आनंदवाडी ता.शिरुर अनंतपाळ ह.मु कन्हेरी चौक, लातूर यांनी ४०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ३०००/– रुपरे लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांच्या शेतीच्या सातबाऱ्यावरील अज्ञान पालक म्हणुन असलेले आईचे नाव कमी करुन व तक्रारदार यांच्य नावात झालेल्या चुकीची दुरुस्ती करुन सातबाऱ्यावर नोंद घेण्याचे कामासाठी एक लोकसेवक ४०००/– रुपये लाचेची मागणी करत असल्या बाबतची तक्रार दिनांक ३०.०९.२०१९ रोजी लाच लुचपत प्रतिबंध विभाग, लातूर. यांचेकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक ३०/०९/२०१९ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक तलाठी अनंत भानुदास चलमले यांनी तक्रारदार यांच्या शेतीच्य सातबाऱ्यावरील अज्ञान पालक म्हणुन असलेल्या आईचे नाव कमी करुन व तक्रारदार यांच्या नावात दुरुस्ती करुन सातबाऱ्यावर नोंद घेण्याचे कामासाठी तक्रारदार यांच्याकडे ४०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०००/– रुपये पंचासमक्ष लाचेची रक्कम घेण्याच मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक ३०/०९/२०१९ रोजी १८.५० वाजता मौजे कोळनुर येथे आरोपी लोकसेवक तलाठी अनंत भानुदास चलमले यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम घेवुन तक्रारदार यांना मौजे कोळनुर गावातील काळे यांचे हॉटेलवर पाठविले असता आरोपी लोकसेवक तलाठी अनंत भानुदास चलमले यांनी ३,०००/– रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्यांचे विरूध्द पोलीस जळकोट जि. लातूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम (संशोधन) २०१८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

पुढील तपास पोलीस उप अधिक्षक माणिक बेद्रे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्रीमती कल्पना बारवकर, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती अर्चना पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोह/संजय पस्तापुरे, लक्ष्मीकांत देशमुख पोना/ माहेन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, सचिन धारेकर, दत्ता विभुते, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे मपोशि/रुपाली भोसले चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीसंदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्सास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कमांकावर संपर्क करावा.

१) मा.श्रीमती कल्पना बारवकर पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड. मोबाईल कमांक ८८८८८४१९६५

२) माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक :– मोबाईल कमांक ९९२३६६६६४४

३) कुमार दराडे पोलीस निरीक्षक :– मोबाईल कमांक ९६५७७०९८४१

४) टोल फ्री हेल्पलाईन कमांक :– १०६४

५) कार्यालयाचा फोन कमांक :– ०२४८२–२४२६७४

६) Website :– www.acbmaharashtra.gov.in

७) Mobile App :– www.acbmaharashtra.net

८) Facebook Page :– www.facebook.com/MaharashtraACB

( माणिक बेद्रे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर